E- 2834221


# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 1842/2024-25 | दि. 13/09/2024

**सेवानिवृत्त, शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**।।जाहीर सूचना।।**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागाकरीता शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांमधून शाखा अभियंता (स्थापत्य) या पदासाठी सेवा करार पद्धतीने इच्छुक व पात्र उमेद्वारांकडून अर्ज मागवित आहेत. इच्छुक उमेद्वार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी **आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह** मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि. ठाणे - 401101 येथे दि.24/09/2024 रोजी **सकाळी** 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk in Selection) उपस्थित राहावे.

याबाबतची जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व कामकाजा अनुभव |
|---|---|---|---|
| 1. | शाखा अभियंता (स्थापत्य) (सेवा करार पध्दतीने) | 01 | 1) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य शाखेची पदवी/पदविका.<br>2) शासकीय/निमशासकीय सेवेमधुन पाणीपुरवठा/ मलनि:सारण विभागात वर्ग-01/वर्ग-02 या पदावर कमीत कमी 10 वर्षाचा कामकाजाचा अनुभव आवश्यक. |

<u>अटी व शर्ती</u> :-

1) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 व शासन निर्णय क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100 (भाग-1)/13, दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
2) दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक वेतन व भत्ते लागू राहतील.
3) करारपध्दतीने नेमणूकीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
4) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

5) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

6) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुदध विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

7) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

8) उमेदवाराने अर्ज सादर करताना राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावे.

9) सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवाराला रु.100/- स्टॅम्पपेपरवर हमी देणे बंधनकारक राहील.

10) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अश अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

11) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

12) <u>निवड प्रक्रिया</u> :-

- शाखा अभियंता (स्थापत्य) या पदासाठी उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/1842/2024-25 दि. 13 / 09 /2024

प्रति,

सिस्टीम मॅनेजर,

संगणक विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागासाठी सेवा करारपध्दतीने सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) घेण्याबाबतची जाहीर सूचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. आयुक्त महोदय यांची दि.12/09/2024 रोजीची मान्यता. (ई ऑफीस क्र.768767)

2) जा.क्र.मनपा/आस्था/1842/2024-25, दि.13/09/2024 रोजीची जाहीर सुचना.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागासाठी शासनाकडील/ महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून सेवा करारपध्दतीने सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) या पदासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणेबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि.12/09/2024 रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) या पदाबाबतची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत- जाहिर सूचनेची प्रत

\\deepa1\D\Deepa Tambe\Theka Bharati\शाखा अभियंता\सन 2024-25\लेटर.doc